# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.).
ता.जि. ठाणे – ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ८१९ २८२८
**महिला व बालकल्याण विभाग**


जा.क्र.मनपा/म.बा.अ./२६८/२०१८-१९

दि.१८/१२/२०१८

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

संगणक विभाग
आवक क्र: १३२१
दिनांक : १८/१२/२०१८

**विषय:- निविदा सुचना प्रसिध्दीबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका संकेत स्थळावर offline व्दारे महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाची माहिती पुस्तीका छपाई (कलर) करणेकामीच्या निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकरिता आपल्या विभागास पाठविण्यात येत आहे.

महिला व बालकल्याण अधिकारी
महिला व बालकल्याण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:
सिस्टिम मॅनेजर
संगणक विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

**महिला व बालकल्याण विभाग**

दि.१९/१२/२०१८

जा.क्र.मनपा/ मबावि/२४/२०१८-१९

## // जाहीर निविदा //

महिला व बालकल्याण योजेने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकातील महिला व बालकल्याण विभागाची माहिती पुस्तीका छपाई(कलर) करणेकामी (अंदाजित खर्च रु.१,००,०००/-) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग वेबसाइट www.mbmc.gov.in **Off-line** पध्दतीने इच्छुक अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. सदरकामी अधिक माहिती महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागात दि.२०/१२/२०१८ रोजी पर्यंत उपलब्ध होईल. तसेच भरलेल्या निविदा दि.२७/१२ /२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महिला व बालकल्याण विभागात स्विकारण्यात येतील.सदरकामी निविदा फॉर्म फी रु.१००+ जी.एस.टी १८% असे एकूण रक्कम रु.११८/- व इसारा रक्कम रु.१,०००/- रोखीने दि.२६/१२ /२०१८ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत भरुन त्याची पावती निविदा दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक राहिल.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केली असल्यास उघडण्यात येतील. सदरकामी निविदा मंजुर होताच आदेशानुसार त्वरीत काम करावे लागेल. तसेच कोणतेही कारण न देता एक निविदा स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा आयुक्त सो. यांनी राखून ठेवला आहे.

**डॉ.संभाजी पानपट्टे**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**ठिकाण :- भाईंदर**
दिनांक :- दि.१९/१२/२०१८
प्रत :- संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता, संगणक विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय. छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

## महिला व बालकल्याण विभाग

जा.क्र.मनपा/मबाक/३६८/२०१७-१८ दि १९/१२/२०१८

# ।। निविदा दरपत्रक ।।

सन २०१८-१९

निविदा दरपत्रक क्र.------------------------------------------------- अनुक्रमांक---------------------------

निविदा दरपत्रक फॉर्मची किंमत रु. ११८/- निविदा इसारा रक्कम रु. १०००/-

निविदा दरपत्रकाचे नांव :- महिला व बालकल्याण विभागाची माहिती पुस्तीका छपाई(कलर) करणेकामी

निविदा धारकाचे नांव श्री./ मे. -----------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

पुर्ण पत्ता :- -----------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

निविदा सुचना प्रसिध्दिची तारीख :- दि२०/१२/२०१८

निविदा दरपत्रके विक्रीची मुदत:- दि.२०/१२/२०१८ ते दि.२८/१२/२०१८ वेळ दु.०३.०० वाजेपर्यंत

निविदा दरपत्रक इसारा स्विकारण्याची मुदत:- दि.२६/१२/२०१८ ते दि. -/- /२०१८ वेळ दु.०३.०० वाजेपर्यंत

निविदा दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख:- दि. २८/१२/२०१८ वेळ दु. ०३.०० वाजेपर्यंत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

## महिला व बालकल्याण विभाग

जा.क्र.मनपा/मबाक/३२८/२०१८-१९ दि२९/१२/२०१८

## // निविदा दरसुची //

कामाचे नांव :- महिला व बालकल्याण विभागाची माहिती पुस्तीका छपाई(कलर) करणेकामी

निविदा भरणा-याचे नाव व पत्ता :----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

व्यवसायाचे / संस्थेचे नाव व पत्ता :----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

निविदा इसारा रक्कम रु. -------------------- (अक्षरी रु.-----------------------------------

भरणा पावती क्र.------------------------------------ दिनांक ------------------------------

| अ.क्र | तपशिल | दर |
|---|---|---|
| १. | "माहिती पुस्तिका छपाई(कलर)" | |

**निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.**

अ) लिफाफा क्र. १. मध्ये (**Envelop No. 1**)

१. इसारा रक्कम भरणा केलेली पावती
EMD Payment receipt

ब) लिफाफा क्र. २. मध्ये (**Envelop No. 2**)

१. दरसुची (**Rate list**)

निविदाधारकाची सही व शिक्का

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

## महिला व बालकल्याण विभाग

जा.क्र.मनपा/मबाक/२६८/२०१८-१९

दि ३१/१२/२०१८

### निविदा दरपत्रकाविषयी अटीशर्ती सन २०१८-१९

१) निविदा संबधीत सविस्तर माहीती संबंधीत खात्यात विनामुल्य मिळेल.

२) निविदा फॉर्म किंमत निविदेसोबत भरणे बंधनकारक राहिल.

३) सदर निविदेसोबत इसारा रक्कम भरणे बंधनकारक राहिल.

४) निविदा बयाणा वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.

५) निविदाधारकाने निविदा दरपत्रकातच दर भरुन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे सादर केले पाहिजेत.

६) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.

७) निविदाधारकाने निविदा दरपत्रात प्रत्येक भेटवस्तुची दराची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात स्पष्ट अक्षरात अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड करु नये.

८) निविदा सादर करताना खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने कराव्यात.

अ) लिफाफा क्र. १. मध्ये (**Envelop No. 1**)

१) इसारा रक्कम भरणा केलेली पावती
EMD Payment receipt

ब) लिफाफा क्र. २ मध्ये (**Envelop No. 2**)

१) दरसुची(**Rate list**)

९) महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा दरपत्रक उघडण्यात येईल. त्यादिवशी निविदाधारक किंवा ह्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यांत येतील. निविदा दरपत्रक उघडताना प्रथम लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रे परिपुर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

१०) कोणतीही निविदापत्रिका पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा दरपत्रक नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता निविदा दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा आहे.

११) मंजुर निविदाधारकाकडुन नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य कर बिलातुन कापुन घेण्यात येतील.

१२) निविदाधारकाची निविदा दरपत्रक नामंजुर झाल्यास इसारा रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास परत करण्यात येईल.

१३) निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदा दरपत्रकातील नियम व अटी मान्य असल्याबद्दल त्यावर नाव शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

डॉ.संभाजी पानपट्टे
मिरा-भाईंदर महानगरपालिका